# जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार
## प्रशासकीय इमारत, टोकरतलाव रोड, नंदुरबार ता.जि. नंदुरबार
## विधी अधिकारी पद कंत्राटी पध्दतीने भरणे बाबत जाहिरात
### जाहिरात क्रमांक ब/कक्ष-1/आस्था-1/वि.अ.जा./कावि/२१०/2019 दिनांक २१ /08/2019

---

कार्यासन अधिकारी, महसूल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक दिनांक 06 एप्रिल 2011 व दिनांक 14/11/2013 अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयाचे न्यायालयीन कामकाजासाठी उदा. विविध स्तरावरील न्यायालयीन प्रकरणात परिच्छेद निहाय अहवाल तयार करणे, शपथ पत्र तयार करणे, तसेच न्यायालयीन प्रकरणामध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी पुर्व तयारी करणे, जिल्हास्तरावर विधी अधिकारी हे एक पद कंत्राटी पध्दतीने 11 महिन्यांच्या तत्वावर भरणेकामी निर्माण केलेले आहे.

महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक ईएसटी/2010/प्र.क्र. 42/ ई-8 दिनांक 30 जुलै 2011 मध्ये केलेल्या अटी व शर्ती नुसार नंदुरबार जिल्हया करीता विधी अधिकारी हे पद कंत्राटी पध्दतीने 11 महिन्यांच्या कालावधीसाठी पात्र उमेदवाराकडून दिनांक 31--/08/2019 पावेतो अर्ज मागविणेत येत आहेत.

**कंत्राटी विधी अधिकारी पदाची संख्या** : 1 पद

**निवड पध्दत** : पात्र उमेदवारांची मुलाखत घेऊन अंतिम निवड करण्यात येईल.

**शैक्षणीक अर्हता व अनुभव** :

1. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर व वकीली व्यवसायाचा अधिकृत सनदधारक असावा.
2. विधी अधिकारी या पदासाठी वकीली व्यवसायाचा किमान 7 वर्षाचा अनुभव आवश्यक राहील. (अनुभवाचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकारणाचे असावे.)
3. उमेदवार महसूल विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदे विषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.
4. उमेदवारांस मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे उत्तम ज्ञान असावे.
5. विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकाचे वेळी 45 वर्षापेक्षा जास्त नसावे.

वरील बाबींची पुर्तता करणाऱ्या व अनुभव धारण असणाऱ्या उमेदवारांचा विधी अधिकारी या पदासाठी प्राधान्याने विचार करण्यात येईल. शासन महसूल व वनविभागाकडील निर्णय क्रमांक संकीर्ण-2016/प्र.क्र. 107/ ई-8 दिनांक 15 सप्टेंबर 2017 अन्वये कंत्राटी विधी अधिकारी पदासाठी एकत्रित अनुज्ञेय मानधन + दुरध्वनी व प्रवास खर्च रुपये 30,000 + 5000 एकुण 35,000/- इतके ठोक रक्कम दरमहा राहील.

**महत्वाची सुचना :**

1. अर्ज विहीत नमुन्यात असावा. अर्जाचा विहीत नमुना या कार्यालयाच्या nandurbar.nic.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.
2. अपुर्ण माहिती असलेले अर्ज रद्द ठरविले जातील व याबाबत फेरविचार केला जाणार नाही. म्हणून उमेदवाराने अर्ज सादर करतांना योग्य ती दक्षता घ्यावी.
3. अर्जामध्ये उमेदवाराचे संपूर्ण नांव, पत्र व्यवहाराचा पुर्ण पत्ता, जन्म तारीख, वय, शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव इ. बाबत संपूर्ण तपशील इ. माहिती नमूद करुन प्रमाणपत्रांच्या स्वाक्षांकित प्रती जोडाव्यात. कृपया मुळ प्रमाणपत्राच्या प्रती अर्जा सोबत जोडू नयेत.
4. उमेदवारांनी आपले अर्ज समक्ष किंवा पोस्टाद्वारे मा. जिल्हाधिकारी, नंदुरबार, जिल्हाधिकारी कार्यालय, (आस्थापना शाखा) प्रशासकीय इमारत, टोकरतलाव रोड नंदुरबार ता. जि. नंदुरबार या पत्त्यावर दिनांक 22/08/2019 ते 31--/08/2019 या कालावधीत कार्यालयीन कामाचे दिवशी सकाळी 10-00 ते सायंकाळी 5-00 वाजे पावेतो

पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. दिनांक 31-/08/2019 नंतर पोस्टाद्वारे व अन्य प्रकारे प्राप्त होणाऱ्या अर्जांची तसेच ह्या जाहिरातीच्या दिनांकापुर्वी अर्ज केलेल्या उमेदवारांचा अथवा त्यासंबंधी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. तसेच उमेदवारांचे अर्ज शासकिय सुटीच्या दिवशी स्विकारले जाणार नाहीत.

5. अर्जावर उजव्या बाजूस स्वत:चा अलीकडे काढलेला पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा. तसेच अर्जाच्या पाकीटावर डाव्या बाजूस **" कंत्राटी विधी अधिकारी पदासाठी अर्ज "** असा स्पष्ट उल्लेख करावा.
6. निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीपुर्वी शासन निर्णय दिनांक 30/07/2011 यातील विहीत नमुन्यात करारपत्र (Agreement) करुन द्यावे लागेल तसेच सदर पदासाठी वेळोवेळी निर्गमीत झालेल्या निर्णय त्यांचेवर बंधनकारक राहतील.
7. निवड झालेल्या उमेदवाराने त्यांना कंत्राटी विधी अधिकारी, म्हणून नियुक्ती दिल्या नंतर, त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात, कार्यालयीन वेळेत उपस्थित राहणे बंधनकारक राहील.
8. कंत्राटी विधी अधिकारी यांना महसूल अधिकारी यांचेकडील महसूल विषयक/परिच्छेदनिहाय अभिप्राय (parawise comments)/ सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी/फौजदारी इत्यादी तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
9. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिल यांचेकडेस पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र संबधीत अधिका-यांच्या मदतीने तयार करणे.
10. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.
11. सर्व प्रकारचे दावेबाबत पर्यवेक्षण व वेळोवेळी आढावा घेवून दावे निपटारा करणेबाबत कार्यवाही करणे बंधनकारक राहील.
12. सदर पदाची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. सदरहू विधी अधिकारी शासकीय कर्मचारी म्हणुन गणले जाणार नाही.
13. सेवा समाप्तीचे सर्व अधिकार हे जिल्हाधिकारी यांना असतील.

**(डॉ. राजेंद्र भारुड)**
**जिल्हाधिकारी, नंदुरबार**

प्रत :- म. जिल्हा न्यायाधिश नंदुरबार/ धुळे/ जळगांव/ नाशिक/ यांचेकडेस माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रत :- म. अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधिश, नंदुरबार/ शहादा/ धुळे/ जळगांव/ नाशिक/ यांचेकडे माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रत :- म. दिवाणी न्यायाधिश, (वरिष्ठ स्तर) नंदुरबार/ शहादा/ धुळे/ जळगांव/ नाशिक यांचेकडे माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रत :- म. दिवाणी न्यायाधिश, (कनिष्ठ स्तर) नंदुरबार / धुळे/ जळगांव/ नाशिक यांचेकडे माहितीसाठी स्सनेह अग्रेषित.
प्रत :- म. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, नंदुरबार / धुळे/ जळगांव/ नाशिक/ नवापूर/ शहादा/ तळोदा/ अक्कलकुवा/ अक्राणी यांचेकडे माहितीसाठी.

2/- यांना विनंती की, सदर जाहिरातीची प्रत आपल्या न्यायालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करुन प्रसिध्दी अहवाल इकडील कार्यालयास पाठविण्यात यावा.

प्रत :- उपविभागीय अधिकारी, उपविभाग नंदुरबार/ तळोदा/ शहादा यांचेकडेस माहितीसाठी रवाना.
प्रत :- तहसिलदार, नंदुरबार/ नवापूर/ तळोदा/ अक्कलकुवा/ शहादा/ अक्राणी यांचेकडेस माहितीसाठी रवाना.
प्रत :- सहाय्यक सरकारी वकील, नंदुरबार/ धुळे/ जळगांव/ नाशिक यांचेकडेस माहिती व उचित कार्यवाहीसाठी सस्नेह
प्रत :- म. अध्यक्ष बार कौन्सिल, नंदुरबार/ धुळे/ जळगांव/ नाशिक/ नवापूर/ शहादा/ तळोदा/ अकक्लकुवा/ अक्राणी यांचेकडेस माहितीसाठी सस्नेह.

**(अनिल न. पवार)**
**निवासी उपजिल्हाधिकारी, नंदुरबार**